निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्री. दारोळे संजित रमेश, तत्कालीन
कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पारनेर

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/६००१९/७९३/२०२४
अहमदनगर दिनांक०२/०७/२०२४

वाचा :- १. इकडील निलंबन आदेश क्रं.आस्था-३/५६७/२०१८ दिनांक १८/०५/२०१८
२. इकडील दोषारोपपत्र जा.क्रं.आस्था-३/६७२/२०१९ दिनांक १७/०९/२०१९
३. श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक यांचा खुलासा दि २०/०९/२०१९
४. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि/आस्था-३/०६/२०२० दिनांक ०३/०१/२०२०
५. श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक यांचा खुलासा दि २१/०१/२०२०
६. इकडील आदेश जा.क्र.आस्था-३/६००१९/३८३/२०२३ दिनांक ३१/०३/२०२३
७. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१३४३/२०२३ दिनांक १३/१०/२०२३
८. उपअभियंता जि.प.सा.बा उपविभाग राहुरी यांचेकडील पत्र जा.क्र.जिपसावा/आस्था/७४०/२०२३ दिनांक ०९/११/२०२३ समवेत श्री. दारोळे यांचा खुलासा दिनांक ०७/११/२०२३
९. उपअभियंता जि.प.सा.वा उपविभाग राहुरी यांचेकडील पत्र जा.क्र.जिपसावा/आस्था/२८८/२०२४ दिनांक ०८/०५/२०२४ समवेत श्री. दारोळे यांचा खुलासा दिनांक २२/०४/२०२४
१०. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक हे पंचायत समिती पारनेर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी गैरवर्तन व हलगर्जिपणा केल्याने श्री. दारोळे यांना संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्र.२ अन्वये ज्ञापन/दोषारोपपत्र बजावण्यात येऊन खुलासा सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. संदर्भ क्र.३ अन्वये श्री. दारोळे यांनी दोषारोपपत्राचा खुलासा सादर केलेला आहे. सदर लेखी खुलाश्यानुसार श्री. दारोळे यांनी खुलाश्यातील बाबी सत्य असुन नाविलाजास्तव त्यांचेवर ठेवणेत आलेले आरोप मान्य करीत असलेबाबत नमुद केले आहे.

श्री. दारोळे यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप मान्य केले असलेने संदर्भ क्र. ५ च्या आदेशानुसार त्यांची पुढील वेतनवाढ भावीकाळातील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने एक वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात रोखणेची शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

श्री. दारोळे यांचा दिनांक ३०/०५/२०१८ ते दिनांक १५/०१/२०२० अखेर एकुण ५९६ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

संदर्भ क्रमांक ७ नुसार श्री. दारोळे यांना नोटीस वजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री. दारोळे यांचा संदर्भ क्रमांक ७ नुसार खुलासा सादर केलेला आहे. श्री. दारोळे यांनी त्यांचे खुलाशात नमुद केले आहे की दिनांक ३०/०५/२०१८ ते दिनांक १५/०१/२०२० चा निलंबन कालावधीस त्यांचेकडुन विलंब झालेला नसल्याने व त्यांची सद्यस्थितीची वैद्यकिय सहानभुतीपुर्वक विचार करुन त्यांचा दिनांक ३०/०५/२०१८ ते दिनांक १५/०१/२०२० अखेर एकुण ५९६ दिवस निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणासाठी सेवाकाळ म्हणुन धरणेवावत आदेश होणेस विनंती केलेली आहे.

श्री. दारोळे यांना सदर प्रकरणी त्यांची पुढील वेतनवाढ भावीकाळातील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने एक वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात रोखणेची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. त्यामुळे श्री. दारोळे यांचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक यांचा दिनांक ३०/०५/२०१८ ते दिनांक १५/०१/२०२० अखेर एकुण ५९६ दिवस कालावधी हा निलंबन काळ हा सेवानिवृत्तीविषयक लाभासाठी सेवा काळ धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.सा.बा. उपविभाग राहुरी यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20240702040060 असा आहे.

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री. दारोळे संजित रमेश, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.सा.बा. उपविभाग राहुरी.

द्वारा व प्रत :- उपअभियंता, जि.प.सा.बा. उपविभाग राहुरी.

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत :- निवडनस्ती.

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर